नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### माजीमंत्री प्राजक्त तनपुरे 'ईडी'मुक्त!

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांची साखर कारखाना खरेदी-विक्री प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहाराच्या खटल्यातून बुधवारी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मुक्तता केली. राहुरी पोटनिवडणुकीमध्ये तनपुरे यांच्या भूमिका सुरुवातीपासून चर्चेत असताना उद्याच्या (गुरुवारी) मतदानाच्या पार्श्वभूमीवर हा निकाल आल्याने त्याची सर्वत्र मोठी चर्चा आहे. दरम्यान, माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनीच ही माहिती दिली.

### शिवसेना शिंदे गटात राजीनामा सत्र

मुंबई (स. गांवकरी) : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत नाराजीचा सूर उमटताना दिसून येत आहे. साताऱ्यातील नाराजीनाट्यानंतर रायगड जिल्ह्यातील खोपोली तालुक्यातही शिंदे गटातील अंतर्गत वाद उफाळून आला. दोन दिवसांपूर्वीच साताऱ्यातील शिंदेसेनेचे शहरप्रमुख नीलेश मोरे यांच्यासह शेकडो पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचा तडकाफडकी राजीनामा दिला होता. त्यानंतर खोपोलीतील पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटाला सोडचिठ्ठी देऊन आज राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला. खोपोली नगरपालिकेच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर शिंदेसेनेतील अनेक पदाधिकारी नाराज होते. त्यांच्या आपल्या गोटात खेचून आणण्यासाठी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी रणनीती आखली होती. अखेर नाराज झालेल्या पदाधिकाऱ्यांनी धनुष्यबाणाची साथ सोडून घड्याळ हाती घेतले. या पक्षप्रवेश सोहळ्याला जिल्हाध्यक्ष घारे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुनील पाटील, तालुकाध्यक्ष संतोष बैलमारे, कर्जतचे तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

### भाजपाच्या मोर्चावर गुन्हा?

मुंबई (स. गांवकरी) :
लोकसभेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्यानंतर भाजपाने देशभरात आंदोलनाचा पवित्रा घेतला. मंगळवारी मुंबईतील वरळी भागात भाजपाकडून जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चादरम्यान एका महिलेने वाहतूक कोंडींचा मुद्दा उपस्थित करत मंत्री गिरीश महाजन यांना जाब विचारला. त्यामुळे या मोर्चाची संपूर्ण राज्यभरात जोरदार चर्चा झाली. यादरम्यान भाजपाने काढलेल्या मोर्चात नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करीत पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची तयारी केल्याचे सांगितले जात आहे.

# लखनौचा घरच्या मैदानावर पराभव

## रिषभ पंतसह लखनौचे चार जण भोपळा फोडण्यात अपयशी, राजस्थानचा ४० धावांनी दणदणीत विजय

मुंबई : (स. गांवकरी)

आयपीएलमध्ये आज लखनौ सुपर जायंटस आणि राजस्थान रॉयल्स आमने सामने आलेधा होते. राजस्थान रॉयल्सनं लखनौ सुपर जायंटसला पराभूत केलं आहे. लखनौ टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण त्या निर्णयाचा त्यांना फायदा घेता आला नाही. राजस्थान रॉयल्सनं प्रथम फलंदाजी करताना 20 ओव्हरमध्ये 6 बाद 159 धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना लखनौच्या फलंदाजांना अपयश आलं. एकमेव मिशेल मार्श यानं 55 धावा केल्या. तर, राजस्थानकडून सर्वाधिक 43 धावा रवींद्र जडेजा यानं केल्या. आज जडेजानं गोलंदाजी मध्ये देखील दमदार कामगिरी केली. लखनौचा संघ 119 धावांवर बाद झाला. राजस्थान रॉयल्सनं लखनौवर 40 धावांनी विजय मिळवला. या विजयासह राजस्थाननं यंदाच्या हंगामातील पाचवा विजय मिळवत 10 गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. राजस्थानच्या डावाची सुरुवात वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जयस्वाल या दोघांनी मिळून 32 धावांची सलामीची भागीदारी केली. मोहम्मद शमीनं यशस्वी जयस्वाल याला 22 धावांवर बाद केलं तर ध्रुव जुरेल शुन्यावर बाद झाला.







वैभव सूर्यवंशी 8 धावा करुन बाद झाला. यानंतर रियान पराग यानं 20, हेटमायर यानं 22 धावा केल्या. तर, रवींद्र जडेजा 43 धावा करुन नाबाद राहिला. डी. फेरारिया यानं 20 आणि दुबेनं 19 धावा केल्या. यामुळं राजस्थानचा संघ 20 ओव्हरमध्ये 6 बाद 159 धावा करु शकला. या धावसंख्येचा पाठलाग करण्याचं आव्हान लखनौसमोर होतं. लखनौ सुपर जायंटसच्या फलंदाजांनी घरच्या मैदानावर निराशा केली. लखनौकडून केवळ मिशेल मार्श यानं 41 बॉलमध्ये 55 धावा केल्या. यानंतर निकोलस पूरन यानं 22 धावा केल्या. हिम्मत सिंग यानं 15 धावा केल्या. लखनौचे इतर फलंदाज दोन अंकी धावसंख्या गाठू शकले नाहीत. मुकूल चौधरी यानं 7, मोहम्मद शमी यानं 6 आणि दिग्वेश राठीनं 2 धावा केल्या. तर मोहसीन खान, आयुष बदोनी, रिषभ पंत आणि एडन मार्करम या चार खेळाडूंना खातं उघडता आलं नाही. यामुळं लखनौचा संघ 119 धावांवर बाद झाला.

लखनौ गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे तर राजस्थान रॉयल्सनं गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. लखनौ सुपर जायंट्स (प्लेइंग इलेव्हन): मिशेल मार्श, आयुष बदोनी, रिषभ पंत (विकेट कीपर/कर्णधार), निकोलस पूरन, एडेन मार्करम, मुकुल चौधरी, मोहम्मद शमी, मोहसिन खान, प्रिन्स यादव, दिग्वेश सिंह राठी, मयंक यादव

राजस्थान रॉयल्स (प्लेइंग इलेव्हन): यशस्वी जयस्वाल, वैभव सूर्यवंशी, ध्रुव जुरेल (विकेट कीपर), रियान पराग (कर्णधार), शिमरोन हेटमायर, डोनोवन फरेरा, रवींद्र जडेजा, जोफ्रा आर्चर, रवि बिश्नोई, बृजेश शर्मा, नांद्रे बर्गर

# अमेरिका-इराण शांतता चर्चेची दुसरी फेरी लवकरच?

मुंबई : (स. गांवकरी)

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराण-अमेरिका यांच्यातील शांतता चर्चेत मध्यस्थी करत असलेल्या पाकिस्तानमधील सूत्रांनी दोन्ही देशांमधील चर्चेची दुसरी फेरी या आठवड्याच्या अखेरीस होऊ शकते, असे संकेत दिले आहेत. न्यूयॉर्क पोस्टने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला अमेरिका आणि इराण यांच्यात नियोजित असलेली चर्चा होऊ शकली नव्हती, त्यानंतर ही 'गुड न्यूज' समोर आली आहे. इराणने या चर्चेत सहभागी होणार की नाही हे स्पष्ट करण्यास नकार दिल्यामुळे ही चर्चा फिसकटली होती.

न्यूयॉर्क पोस्टशी बोलताना पाकिस्तानी सूत्रांनी सांगितले की, इराणबरोबर सुरू असलेल्या सकारात्मक मध्यस्थीच्या प्रयत्नांमुळे, पुढील '३६ ते ७२ तासांच्या' आत चर्चेची नवीन फेरी होण्याची शक्यता आहे. तसेच जेव्हा ट्रम्प यांना याबद्दल विचारण्यात आले, तेव्हा त्यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली. एका टेक्स्ट मेसेजमध्ये "हे शक्य आहे! राष्ट्राध्यक्ष डीजेटी" असे ट्रम्प म्हटल्याचे रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबरोबरचा युद्धविराम वाढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर चर्चेची नवीन टाईमलाईन समोर आली आहे. मंगळवारी मध्यरात्री युद्धविरामाची मुदत संपणार होती. मात्र, इराणकडून युनिफाईड प्रपोजल येत नाही तोपर्यंत




पाकिस्तानच्या विनंतीवरून हा युद्धविराम वाढवला जाईल, असेही ट्रम्प म्हणाले होते. "मी आमच्या लष्कराला नाकेबंदी कायम ठेवण्याचे आणि इतर सर्व बाबतीत सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे, जोपर्यंत त्यांचा प्रस्ताव सादर केला जात नाही आणि चर्चेतून तोडगा निघत नाही, तोपर्यंत मी युद्धविराम कायम ठेवत आहे," असे ट्रम्प यांनी मंगळवारी ट्रुथ सोशलवर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले होते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी ही घोषणा केल्यानंतर पाकिस्तानी सूत्रांनी सांगितले होते की, पाकिस्तान इराणबरोबर चर्चा सुरू ठेवेल आणि ३६ ते ७२ तासांची टाईमलाईन ही याच प्रयत्नांवर आधारित आहे. "दोन्ही बाजूंकडून तीव्र शब्दीक टीका केली जात असली तरी युद्धविराम अजूनही टिकून आहे, ज्यामधून दोन्ही बाजूंचा सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो," असेही सूत्रांनी म्हटले आहे.

# एमएचटी-सीईटीच्या विद्यार्थ्यांना दिलासा, प्रवेश नोंदणीस मुदतवाढ

मुंबई : (स. गांवकरी)

अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व कृषी शिक्षण या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या एमएचटी सीईटीच्या पीसीएम व पीसीबी समूहाच्या दुसऱ्या संधीसाठी नोंदणी करण्यास राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) एक दिवसाची विशेष मुदतवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी दुसऱ्या संधीसाठी नोंदणी केली नाही, अशा विद्यार्थ्यांना २३ एप्रिल रोजी एक दिवस नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करण्यात आली आहे. एमएचटी सीईटीच्या दुसऱ्या संधीसाठी नोंदणी न केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाकडे प्रत्यक्ष भेट देऊन, ई-मेल आणि दूरध्वनीद्वारे नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन सीईटी कक्षाने पीसीएम व पीसीबी



समूहाच्या दुसऱ्या संधीच्या सीईटीसाठी विलंब शुल्कासह एक दिवसाची मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २३ एप्रिल रोजी नावनोंदणी करता येणार आहे. दुसऱ्या संधीसाठी नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही अंतिम संधी असणार आहे. त्यामुळे त्यांनी तत्काळ नोंदणी करावी, असे आवाहन सीईटी कक्षाकडून करण्यात आले आहे. दुसऱ्या संधीसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या http://www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### दुसऱ्या संधीसाठी ४ लाख २६ हजार २८४ विद्यार्थ्यांची नोंदणी

महाराष्ट्रातील एमएचटी सीईटीच्या (पीसीएम व पीसीबी) विद्यार्थ्यांना प्रथमच प्रवेश परीक्षेच्या दोन संधी दिल्या जात आहेत. आजपर्यंत या सीईटीसाठी दुसऱ्या संधीची नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४ लाख २६ हजार २८४ इतकी आहे. एमएचटी पीसीएम सीईटीच्या दुसऱ्या संधीसाठी ३ लाख १४ हजार ४७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, तर एमएचटी पीसीबी सीईटीच्या दुसऱ्या संधीसाठी १ लाख ११ हजार ८०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

# कल्पना खरातच्या अडचणीत वाढ; अटकपूर्व जामीन फेटाळला



राहाता : (स. गांवकरी)

भोंदू अशोक खरातची फरार पत्नी कल्पना खरात हिने वकिलांमार्फत अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेला अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फिर्यादी व आरोपींचे वकील तसेच पोलिसांचा युक्तिवाद ऐकून घेत फेटाळला. त्यामुळे कल्पना खरातच्या अडचणीत वाढ झाली आहे. शिर्डीतील चार एकर भूखंड खरेदीप्रकरणी जमीन व्यवहाराच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक व सावकारकीच्या कायद्यानुसार रावसाहेब गोंदकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भोंदू अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात व इतर ३ अशा एकूण ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्पना खरात ही शिर्डीतील गुन्ह्यात आरोपी असून तिने राहाता सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. फिर्यादीचे वकील शुभम गोंदकर, सरकारी वकील सतीश पानगव्हाणे तसेच बचाव पक्षाचे वकील प्रशांत गिरी यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. बचाव पक्षाचे वकील गिरी यांनी सांगितले की, रावसाहेब गोंदकर यांच्या जमीन खरेदीसंदर्भातील कोणत्याही बैठकीत कल्पना खरात उपस्थित नव्हत्या.

त्यामुळे अशोक खरात यांच्या कथित कृत्यांसाठी त्यांच्या पत्नीला जबाबदार धरता येणार नाही तसेच कल्पना खरात यांच्या बँक खात्यांचा वापर पतीकडून होत असल्याने आर्थिक व्यवहार त्यांच्या माहितीत होतेच असे म्हणता येणार नाही. त्यांच्या पतीविरुद्धच्या आरोपात कल्पना खरातचा सहभाग नाही. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे संगोपन आणि पोलिसांना आवश्यक कागदपत्रे आधीच उपलब्ध असल्यामुळे कोठडीची गरज नसल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच तपासात सहकार्य करण्याची आणि रोज हजेरी लावण्याची तयारी दर्शवली.

सरकारी पक्षाने मात्र या दाव्यांना विरोध करताना सांगितले की, 'पॉवर ऑफ अटर्नी' करताना कल्पना खरात स्वतः उपस्थित होत्या. संबंधित कागदपत्रांवर त्यांच्या स्वाक्षऱ्या, अंगठ्याचे ठसे आणि छायाचित्रे आहेत. याशिवाय व्याज व्यवहारात २ टक्के रक्कम त्यांना देण्याचा उल्लेख असल्याने त्यांना व्यवहाराची माहिती नव्हती हा दावा ग्राह्य धरता येत नाही, तसेच सावकारकी परवान्याबाबत प्रश्न उपस्थित करत मृत जितेंद्र शेळके यांच्या साक्षीचाही संदर्भ दिला. फिर्यादी रावसाहेब गोंदकर यांचे वकील शुभम गोंदकर यांनी नोंदणीकृत मुखत्यारपत्र आणि विविध माध्यमांतून झालेल्या आर्थिक व्यवहारांचा दाखला देत कल्पना खरात यांचा सहभाग असल्याचे सांगितले. पत्नीच्या खात्याचा पतीकडून वापर होणेही गैर असल्याचे त्यांनी नमूद केले. तपास अधिकारी निवांत जाधव यांनी न्यायालयात सांगितले की, कल्पना खरात कोणतीही नोकरी करत नसतानाही त्यांच्या खात्यातून सुमारे ७ कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. या रकमेचा स्रोत तपासणे आवश्यक आहे. तपासात ५७ मालमत्ता समोर आल्या असून त्यापैकी सुमारे ४० टक्के मालमत्ता कल्पना खरात यांच्या नावावर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे त्यांना व्यवहाराची माहिती नसल्याचा दावा ग्राह्य धरता येणार नाही असे त्यांनी न्यायालयासमोर मांडले. कल्पना खरातच्या खात्यातून पैसे गेल्याचे आरोपीच्या वकिलाने मान्य केले.

कल्पना खरात प्राप्तिकर विभागाला संपूर्ण कर भरते, शिवसंकल्प हार्डवेअर हा तिचा व्यवसाय आहे. असा युक्तिवाद आरोपीचे वकील प्रशांत गिरी यांनी केला. कल्पना खरातच्या विरहित जमिनीचा व्यवहार झालेला आहे. त्यामुळे यामध्ये आरोपी करू नये.

कल्पना खरातच्या विरोधात याआधी कुठलाही फसवणुकीचा गुन्हा दाखल नाही, असा युक्तिवाद आरोपीचे वकील प्रशांत गिरी यांनी केला.

### शोध घेण्याचे पोलिसांपुढे आव्हान

दरम्यान, ३१ मार्चपासून फरार असलेल्या कल्पना खरातचा शोध घेणे शिर्डी पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. कल्पना खरात पोलिसांसमोर शरण येणार का, की उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राहुरी पोटनिवडणुकीच्या मतदानासाठी प्रशासन सज्ज

## सावलीसाठी मंडप, पिण्याचे पाणी : प्रचार रंगला नाही

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उद्या, गुरुवारी मतदान होत आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्ण सज्ज झाली आहे. एकूण ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. त्यासाठी सर्व ३७४ मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तीव्र उन्हाळा व पोटनिवडणुकीच्या प्रचारातील उदासीनता यामुळे मतदानाचा टक्का वाढवण्याचे आव्हान प्रशासन व निवडणूक रिंगणातील उमेदवारांच्या यंत्रणांपुढे आहे. यंदाच्या निवडणुकीतील एक अत्यंत महत्त्वाचा व नाविन्यपूर्ण बदल म्हणजे, मतदान कर्मचाऱ्यांना ईव्हीएम व साहित्यासाठी मुख्यालयात एकत्र येण्याची गरज पडली नाही त्याऐवजी, त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवरच थेट साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उप जिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके यांच्या मार्गदर्शनाखाली व निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव यांच्या देखरेखीखाली या निवडणूक प्रक्रियेचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. वेळ व श्रमाची बचत व्हावी यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्व मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आज, बुधवारी सकाळी थेट त्यांना नेमून दिलेल्या मतदान



केंद्रांवरच पोहोचायचे होते. तेथेच त्यांना ईव्हीएम यंत्र आणि इतर सर्व आवश्यक मतदान साहित्य क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत पोहोच करण्यात आले. तसेच, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे साहित्य पुन्हा केंद्रावरूनच क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे जमा करावयाचे आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली ३६ पोलीस अधिकारी, ७०८ पोलीस कर्मचारी आणि ३९१ गृहरक्षक दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत.



## थोडक्यात पण महत्वाचे



### ११ आदिवासी दुर्गम भागातील ग्रामपंचायत गावांना पाणी टँकर सुरू

शिवनेरी (स. गांवकरी) : ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद पुणे, उपविभागीय अधिकारी जुन्नर / आंबेगाव , तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालय जुन्नर यांनी जल जीवन मिशन योजना प्रगतीत जिल्हा परिषद पुणे विभागातून जुन्नर तालुक्यातील ११ आदिवासी दुर्गम भागातील ग्रामपंचायत गावांना पाणी पुरवठा नियोजन करण्यात आले आहे . आदिवासी दुर्गम भागातील शिंदेवाडी , आणे , मांडवे , कोपरे , सुकाळवेढे , हडसर , निमगिरी , गोद्रे , आजनावळे , नळावणे , हडसर या ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण , वाड्या , वस्त्या व परिसरातील एकूण १५ ,३६१ नागरिकांना ११ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे .यासाठी १० विहिरी व १ बोरवेल मधून नागरिकांना पिण्यासाठी पाणी देण्यात येत आहे . पाण्याचे टँकर २०,०००/- , १२,०००/- , व १०,०००/- लिटर क्षमतेचे आहेत यामुळे सर्व टंचाईग्रस्त आदिवासी भागातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा सुरू आहे.

### अवैध प्रवासी वाहतुकीवर पडघा पोलिसांचा अंकुश; कारवाईचे सत्र सुरू

भिवंडी (स. गांवकरी) : कल्याण–मुरबाड मार्गावरील रायते येथे झालेल्या भीषण अपघातात ११ जणांचा मृत्यू झाल्यानंतर अवैध प्रवासी वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या दुर्घटनेची आठवण अजूनही नागरिकांच्या मनातून पुसली गेलेली नसताना, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पडघा पोलिसांनी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पडघा परिसरात काळी-पिवळी जीप, व्हॅन तसेच रिक्षांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी कोंबून वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढत होत्या. भाड्याच्या हव्यासापोटी चालक प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत असल्याचे चित्र दिसून येत होते. या पार्श्वभूमीवर पडघा ते भिवंडी आणि पडघा ते कल्याण या मार्गांवरील अवैध प्रवासी वाहतुकीवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पडघा परिसरात वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे रस्त्यांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. बाजारपेठा, शैक्षणिक संस्था आणि महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांवर दररोज वाहतूक कोंडी होत असून, नियोजनाच्या अभावामुळे परिस्थिती अधिकच गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर, पडघा स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा पोलिस ठाण्याने अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात कारवाईचे सत्र सुरू केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाईसह कठोर पावले उचलली जाणार असल्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत, अशा प्रकारच्या जीवघेण्या वाहतुकीला आळा घालण्याचा निर्धार पोलिस प्रशासनाने व्यक्त केला असून, प्रवाशांनीही नियमांचे पालन करत सुरक्षित प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### बापगावमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील बापगाव सायराम नगर फेज वन येथे छत्रपती शिवाजी महाराज,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती १८/०४/२०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी जयंती निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. त्यात लहान मुलांनी नृत्य, गायन आणि विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी समाजसेवक गणेश दादा मेहेर यांनी महापुरुषांच्या प्रतिमा असलेल्या आकर्षक ट्रॉफीज देऊन सहभागी झालेल्या मुलांचा उत्साह वाढवला.मंथन मेहेर व कुलदीप काउतकर यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप केले. कार्यक्रमासाठी बिल्डर उमेश पाटील, हेमंत मेहेर, पंचशील मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि पोलिस पाटील नरेश गायकवाड व पुण्यावरून आलेले नाना बोदडे सर आणि सोमा बोदडे इतर मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष.प्रताप बोदडे, गणेश गायकवाड, उद्धव काशिंदे, संदेश जाधव, सचिन सावळे, विशाल बोदडे, मयुर गायकवाड, संदेश सावळे, प्रेम काशिंदे, ओमकार भोईर, राकेश पाटील, विक्रम गांगणे, शांताराम जाधव, सूरज काउतकर, निलेश महाले, भालेराव, रविंद्र कुमार, सनी देओल, पाटील ,गांगुर्डे, रोशन उचित, राजू पाईकराव, विजय पुंडगे, नयन बिजोले, जय गायकवाडया कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रताप बोदडे यांनी केले.

### आनंदा झंपलवाड यांची तातडीने विभागीय बदली करा; अन्यथा आंदोलन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या नांदेड येथील सहाय्यक आयुक्त कार्यालयात कार्यरत असलेले कनिष्ठ लिपिक आनंदा मारोती झंपलवाड यांच्यावर गंभीर आरोप करत, त्यांची तातडीने विभागीय बदली करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या रेखा ढवळे यांनी केली आहे. या मागणीची दखल न घेतल्यास पुणे येथील समाज कल्याण आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमीचा आरोप प्रधान सचिवांना पाठवलेल्या निवेदनात रेखा ढवळे यांनी नमूद केले आहे की, श्री. झंपलवाड यांची पार्श्वभूमी वादग्रस्त आहे. यापूर्वी मुखेड येथील शासकीय मुलींच्या वसतिगृहात पहारेकरी म्हणून कार्यरत असताना, अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत गैरवर्तन केल्याप्रकरणी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झालेली आहे. असे असतानाही, अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने"ची जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे, याबद्दल निवेदनात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. तक्रारीनुसार, सदर कर्मचारी कार्यालयात येणाऱ्या विद्यार्थिनींना स्कार्फ काढण्यास सक्ती करणे, जाणीवपूर्वक संपर्क वाढवणे, अश्लील हातवारे करणे आणि भुवया उंचावून पाहणे असे प्रकार करत असल्याचा आरोप आहे. केवळ विद्यार्थिनीच नव्हे, तर कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांशीही त्यांचे वर्तन संशयास्पद आणि अश्लील हेतूने प्रेरित असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. "समाज कल्याण विभाग हा शोषित आणि वंचितांसाठी काम करणारा विभाग आहे. अशा ठिकाणी विकृत मानसिकता असलेल्या व्यक्तीमुळे एखादी मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून त्यांची तातडीने जिल्ह्याबाहेर विभागीय बदली करावी," अशी मागणी रेखा ढवळे यांनी केली आहे. "सदर कर्मचाऱ्याच्या वर्तनाबाबत सहाय्यक आयुक्तांना कल्पना असूनही त्यांना अभ्यागतांशी संबंधित महत्त्वाचे टेबल देण्यात आले आहे, ही बाब गंभीर आहे. प्रशासनाने त्वरित पावले न उचलल्यास आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल."

# "सत्यशोधकांच ओतूर"ला अकोलेकरांची प्रेरणादायी भेट

## फुले दांपत्यांच्या कार्याचा ऐतिहासिक ठेवा अनुभवला!

अकोले : (स. गांवकरी)

"सत्यशोधकांच ओतूर" अशी ऐतिहासिक ओळख असलेल्या जुन्नर तालुक्यातील ओतूर गावाला अकोले तालुक्यातील शेकईवाडी येथील ४८ ग्रामस्थांनी शनिवारी भेट देत क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा अनुभवला. या ऐतिहासिक भेटीत तरुणांपासून ७५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत तसेच महिलांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त ही भेट आयोजित करण्यात आली होती. अवघ्या तीन दिवसांत नियोजन करून ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. ५ डिसेंबर १८४८ रोजी ओतूर येथे सुरू झालेली मुलींची चौथी शाळा ही महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पहिली मुलींची शाळा मानली जाते. त्या काळात महिलांना शिक्षणाची संधी नव्हती; मात्र फुले दांपत्यांनी समाजातील रूढी-परंपरांना छेद देत महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.



ओतूर गावाने त्या काळी फुले दांपत्यांना दिलेली साथ आजही अभिमानास्पद मानली जाते. गावातील नारायण पानसरे यांनी शाळेसाठी जागा उपलब्ध करून दिली, तर "जुन्नरचे अफगाण" म्हणून ओळखले जाणारे भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांनी दगडी इमारत उभारून मोठा हातभार लावला. आजही ही इमारत दणकट अवस्थेत असून तिची बांधकाम रचना उत्कृष्ट असल्याचे दिसून येते.



सध्या या शाळेत २६० पेक्षा अधिक विद्यार्थिनी शिक्षण घेत असून ९ शिक्षिका व १ शिक्षक कार्यरत आहेत. मराठी शाळांपुढे पटसंख्येची समस्या असताना ही शाळा त्याला अपवाद ठरत आहे. शाळेच्या इमारतीचे नूतनीकरण करताना मूळ रचना जपूनच काम केले जात असल्याचेही यावेळी पाहायला मिळाले. अकोलेकरांच्या भेटीदरम्यान विद्यार्थिनींनी लेझीमच्या तालावर स्वागत केले. तसेच भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकरभाऊ डुंबरे, उपाध्यक्ष नंदूशेठ भोर, सचिव जयप्रकाश डुंबरे, तुषारभाऊ थोरात, गंगाराम महाराज डुंबरे, वैशाली तांबे, कवी श्रीकांत ढेरंगे, प्रमोद बोडके आदींनी फुले दांपत्यांच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी शाळेतील सेवानिवृत्त व कार्यरत शिक्षिकांचा महात्मा फुले जयंती उत्सव समिती अकोले तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. ताराबाई तांबे, सुशीला डुंबरे, रत्ना शिरसाठ, नंदिनी बेनके, सुमन गाढवे, निर्मला गाढवे, सोनूबाई घुगे, सुशीला हुलावळे यांसह अनेक शिक्षिका उपस्थित होत्या. या भेटीबाबत नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, बाळासाहेब ताजणे, वसंत बाळसराफ तसेच प्रा. बाळासाहेब मेहत्रे, प्रा. डॉ. गुलाबराव मंडलिक, अशोक गायकवाड, रामनाथ शिंदे, भाऊसाहेब मंडलिक आदींनी ओतूरकरांनी जपलेला सत्यशोधक वारसा प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त केली.

## पाच दिवसीय इंटिग्रेटेड योग शिबिर उत्साहात

इंदापूर : (स. गांवकरी)

मार्च 2026 मध्ये इंदापूर येथे संपन्न झालेल्या योग शिबिराच्या दरम्यान पतंजली योगपीठ हरिद्वार चे केंद्रीय प्रभारी पू .स्वामी परमार्थदेव यांनी इंदापूर तालुक्यामध्ये प्रत्येक गावात योग शिबिराचे आयोजन करणे बाबत सूचना केल्या होत्या त्या अनुषंगाने दि . 15 एप्रिल 2026 ते दि . 19एप्रिल 2026 मध्ये पाच दिवसीय शिबिर मौजे झगडेवाडी येथे गावचे आदर्श सरपंच अतुल झगडे व मा .सरपंच रूपाली अतुल झगडे व उपसरपंच डॉ. दादाराव झगडे ,नामदेव झगडे, उपसरपंच सचिन अभंग, नवनाथ अभंग, प्रल्हाद अभंग, गेमदेव अभंग, मोहन झगडे, लक्ष्मण झगडे, अरुण झगडे, व ग्रामस्थ व महिला भगिनी इत्यादींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवा सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने व पतंजलीचे तहसील प्रभारी दतात्रय अनपट व योगशिक्षक शहाजी



बोराटे, भाऊसाहेब शिंदे, संजय मोरे, भारत बोंगाणे डॉ .नंदकुमार यादव, लहू गाढवे , अंकुश डुके, सुधीर मखरे ,राजाभाऊ सोनमाळी दशरथ मोरे ,विलास गाढवे,राजश्री शिंदे,सौ. नीता नलवडे,सौ . इंदुमती बोराटे, सौ .प्रतिभा गुजराथी,सौ . आरती गुजराथी , सौ .हेमलता बोंद्रे , अश्विनी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच दिवसीय इंटिग्रेटेड योग शिबिर उत्साहात व बहुसंख्य साधकांच्या उपस्थितीत संपन्न झाले या शिबिरात ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले त्यांनी अशी ग्वाही दिली की आम्ही हा योग वर्ग निरंतर व निशुल्क सातत्याने चालू ठेऊ अशी ग्वाही दिली.

## रविकांत राठोड यांना विधान परिषदेत संधी द्यावी

### अंबादास धनगर व संजय फुलसुंदर यांच्याकडून जोरदार मागणी!

अकोले : (स. गांवकरी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून येऊ घातलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बंजारा समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी विमुक्त जाती प्रदेशाध्यक्ष तथा बंजारा बिग्रेड भारतचे संस्थापक अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड यांना विधान परिषद सदस्य म्हणून संधी द्यावी, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व्ही जे एन टी महाराष्ट्र राज्याचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास धनगर व राष्ट्रवादी भटके विमुक्त अकोले तालुकाध्यक्ष संजय फुलसुंदर, महाराष्ट्र सरचिटणीस टिशा ताई मांडेवार, प्रदेश उपाध्यक्ष करण सिंग बावरी यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, आगामी विधान परिषद निवडणूक अगदी काही दिवसांवर येऊन ठेपली असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने यावेळी





सामाजिक समतोल राखत बंजारा समाजाला न्याय देणे आवश्यक आहे. समाजातील सक्षम व कार्यक्षम नेतृत्वाला संधी दिल्यास पक्षाची ताकद अधिक वाढेल, असेही त्यांनी नमूद केले.

रविकांत भाऊ राठोड हे तरुण, तडफदार आणि कणखर नेतृत्व म्हणून ओळखले जातात. मागील विधानसभा निवडणुकीत त्यांनी विविध मतदारसंघांमध्ये प्रभावी प्रचार करत पक्षाच्या उमेदवारांना मोठा पाठिंबा मिळवून दिला. त्यांच्या प्रचारामुळे अनेक ठिकाणी महायुतीचे उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

तसेच नगर परिषद निवडणुकांमध्येही रविकांत राठोड यांनी सक्रिय भूमिका बजावत पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण व शहरी भागात त्यांनी पक्षविस्तारासाठी सातत्याने काम केले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला आहे. त्यामुळे अशा दमदार व युवा नेतृत्वाला विधान परिषदेत संधी देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याच पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने रविकांत राठोड यांना उमेदवारी देऊन बंजारा समाजाला न्याय दिल्यास संपूर्ण समाज पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या मागणीमुळे बंजारा समाजामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून रविकांत राठोड यांच्या उमेदवारीसाठी समर्थन वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या मागणीला अधिक बळ मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## NHAI ची निष्काळजीपणा – पुलावरील लोखंडी अँगल 'मृत्यूचा सापळा', जागरूक युवकांनी अपघात टाळला

डांग : गुजरात : (स. गांवकरी)

सरकारकडून कोट्यवधी रुपयांच्या खर्चाने राष्ट्रीय महामार्गांचे बांधकाम केले जाते, परंतु त्याच्या देखभाल आणि सुरक्षिततेबाबत प्रशासन किती निष्काळजी आहे, याचे उदाहरण आहवा–गलाकुंड राष्ट्रीय महामार्गावर दिसून आले. या मार्गावरील टांकलीपाडा गावाजवळील पुलाच्या काँक्रीटमधून अचानक एक लांब लोखंडी अँगल बाहेर येत रस्त्यावर उभा राहिला होता, ज्यामुळे हा महामार्ग 'डेंजर झोन' बनला होता. NHAI च्या गंभीर निष्काळजीपणामुळे हा लोखंडी अँगल रस्त्याच्या मधोमध फूटपाथसारखा बाहेर आला होता.



वेगाने धावणाऱ्या वाहनांसाठी, विशेषतः दुचाकीस्वारांसाठी, हा अँगल मृत्यूचा सापळा ठरू शकला असता. जर एखाद्या वाहनाचे टायर त्यात अडकले असते किंवा रात्री अंधारात तो दिसला नसता, तर मोठा अपघात होण्याची शक्यता होती. असे वाटते की प्रशासन मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत बसले होते.

मात्र, गावातील युवक देवदूत बनून पुढे आले. जेव्हा जबाबदार यंत्रणा निष्क्रिय होती, तेव्हा टांकलीपाडा गावातील जागरूक युवकांनी सामाजिक जबाबदारी पार पाडत हा धोकादायक अँगल मोठ्या मेहनतीने काढून टाकला. त्यांच्या तत्परतेमुळे संभाव्य अपघात टळला आणि अनेकांचे जीव वाचले.

या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या निकृष्ट दर्जा आणि तपासणीतील कमतरतेचा पर्दाफाश झाला आहे. कोट्यवधींचा कर वसूल करणारे अधिकारी एसी कार्यालयातून बाहेर पडून प्रत्यक्ष रस्त्यांची तपासणी करतील का, असा सवाल उपस्थित होत आहे. स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, जर पुलाची अशी अवस्था असेल, तर पावसाळ्यात किंवा जास्त वाहतुकीच्या वेळी तो कधीही कोसळू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी मागणी केली आहे की संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि संपूर्ण मार्गाची सखोल तपासणी करण्यात यावी.

## आळेफाट्यात दिवसाढवळ्या ४ लाखांची थरारक चोरी

आळेफाटा, ता. जुन्नर : (स. गांवकरी)

आळेफाटा येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडलेल्या चोरीच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. वर्दळीच्या ठिकाणी उभी असलेली दुचाकी लक्ष्य करत अज्ञात चोरट्यांनी डिक्की फोडून तब्बल ४ लाख रुपयांची रोकड लंपास केली. विशेष म्हणजे ही घटना पोलीस ठाण्यापासून अगदी जवळ घडल्याने सुरक्षेच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव आनंद येथील दत्तात्रय वाघमारे यांनी सकाळी सुमारे ११ वाजता बँकेतून ५ लाख रुपये काढले होते. त्यापैकी १ लाख रुपये सोबत घेऊन ते जवळच असलेल्या पतसंस्थेत गेले, तर उर्वरित ४ लाख रुपये स्कुटीच्या डिक्कीत ठेवले. काही मिनिटांत परत आल्यानंतर त्यांना डिक्की तुटलेली दिसली आणि आत ठेवलेली संपूर्ण रक्कम गायब झाल्याचे लक्षात आले. या घटनेतील महत्त्वाची बाब म्हणजे संपूर्ण प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाला आहे. प्राथमिक तपासात चोरट्यांनी बँकेपासूनच वाघमारे यांच्यावर नजर ठेवली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. घटना सीसीटीव्हीत कैद झाल्याने तपासाला गती मिळाली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत पाहणी केली. सध्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# अहिल्यानगरात 'अपने अपने राम' रामकथेचा भव्य सोहळा


### मान्यवरांच्या उपस्थितीत भाविक मंत्रमुग्ध!

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

स्व. अरुणकाका जगताप यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त आनंदधाम रोड येथील राष्ट्रीय पाठशाळा मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या रामकथा - अपने अपने राम या भव्य व भावपूर्ण सोहळ्याने संपूर्ण अहिल्यानगर शहर भक्तीमय आणि अध्यात्मिक वातावरणात न्हाऊन निघाले. सुप्रसिद्ध कवी, लेखक आणि ओजस्वी वक्ते डॉ. कुमार विश्वास यांच्या प्रभावी वाणीतून साकारलेल्या रामकथेने उपस्थित हजारो श्रोत्यांच्या मनाला स्पर्श केला.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी भक्तीमय वातावरणात झाली. 'अपने अपने राम' या संकल्पनेतून प्रत्येकाच्या आयुष्यातील रामाची वेगवेगळी रूपे, त्यांचे तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्ये अत्यंत सोप्या, विनोदी आणि हृदयस्पर्शी शैलीत मांडत डॉ. कुमार विश्वास यांनी तब्बल तीन तास श्रोत्यांना खिळवून ठेवले. त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वामुळे संपूर्ण परिसरात एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली होती.





या सोहळ्यास विधान परिषदेचे सभापती राम शिंदे तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. विशेष बाब म्हणजे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी कोणताही विशेष प्रोटोकॉल न ठेवता सामान्य नागरिकांप्रमाणेच प्रवेशद्वारातून आत येत स्टेजसमोर बसून संपूर्ण रामकथेचा आस्वाद घेतला. त्यांच्या या साधेपणाचे आणि लोकाभिमुख वागणुकीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. यावेळी आमदार संग्राम जगताप, विधान परिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांनी कार्यक्रमाला धावती भेट दिली. तसेच माजी खासदार सुजय विखे आणि धनश्रीताई सुजय विखे पाटील या संपूर्ण वेळ कार्यक्रमासाठी उपस्थित राहून रामकथेचा लाभ घेतला.

कार्यक्रमासाठी शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी हजेरी लावली होती. राष्ट्रीय पाठशाळा मैदानावर मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात आली होती. शिस्तबद्ध नियोजन, ध्वनीव्यवस्था आणि प्रकाशयोजनामुळे कार्यक्रम अधिक आकर्षक ठरला. या सोहळ्यामुळे केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक एकात्मतेचा संदेशही देण्यात आला. 'राम' हा केवळ देव नसून आदर्श जीवनमूल्यांचा प्रतीक आहे, हा संदेश या रामकथेतून प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. एकूणच, स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मृतींना अभिवादन करत आयोजित करण्यात आलेला हा 'अपने अपने राम' रामकथा सोहळा अहिल्यानगरकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

# पुण्याचे दैनिक समर्थ गांवकरी संपादक राकेश वाघमारे यांनी आंबेडकर जयंती उत्सव सामाजिक बांधिलकीसह दिमाखात संपन्न

हडपसरमध्ये आंबेडकर जयंतीला सामाजिक व सांस्कृतिक रंगत | रिपाईच्या शशिकलाताई वाघमारे यांच्या उपक्रमांची सर्वत्र प्रशंसा | "कष्टकरी महिलांचा सन्मान आणि लावणीची मेजवानी | पुण्याचे दैनिक समर्थ गावकरी तर्फे ससाणे नगरमध्ये जयंती उत्सव दिमाखात | "आंबेडकर जयंतीतून सामाजिक बांधिलकीचा संदेश | पुण्याचे दैनिक समर्थ गावकरी संपादक राकेश वाघमारे यांचा उपक्रम गाजला


**"हडपसरवासियांची मने जिंकली! सन्मान उपक्रम आणि 'नटरंगी नार' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद" : "जयंती उत्सवाला सामाजिक स्पर्श; महिलांचा सन्मान, सांस्कृतिक जल्लोषाने ससाणे नगर दुमदुमले"**

- "डीजेच्या गोंधळाला पर्याय; शशिकलाताई वाघमारे यांचा संस्कारक्षम आंबेडकर जयंती महोत्सव"









**हडपसर : (स. गांवकरी)**

आंबेडकर जयंतीनिमित्त कष्टकरी महिलांचा सन्मान आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून हडपसरवासियांची मने जिंकण्याचे काम आरपीआय नेत्या शशिकलाताई वाघमारे यांनी केल्याचे मत सर्वपक्षीय मान्यवर व कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. ससाणे नगर येथे आयोजित या भव्य जयंती महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन आरपीआय पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा शशिकलाताई वाघमारे आणि पत्रकार राकेश वाघमारे यांच्या वतीने करण्यात आले होते.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदना व अभिवादन करण्यात आले. यावेळी मनपा स्वच्छता महिला कामगारांचा साडी देऊन सन्मान करण्यात आला. या उपक्रमामुळे कष्टकरी महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

१५ एप्रिल रोजी लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांच्या 'नटरंगी नार' या लावणी व भीमगीतांनी सजलेल्या कार्यक्रमाने उत्सवाची रंगत वाढवली. हजारो नागरिक व महिलांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले. कार्यक्रमात आलेल्या पाहुण्यांचे स्वागत संविधानाची प्रतिमा व शाल देऊन करण्यात आले.

सध्याच्या काळात जयंती उत्सवांमध्ये डीजेच्या दणदणाटामुळे नागरिक त्रस्त होत असताना, शशिकलाताई वाघमारे यांनी सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्राधान्य देत आदर्शवत जयंती उत्सव साजरा केल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून, हडपसर परिसरात या जयंती महोत्सवाची सर्वत्र चर्चा होत आहे.

यावेळी पुण्यनगरीच्या माजी महापौर वैशालीताई बनकर, आरपीआय अहिल्या नगर जिल्हाध्यक्ष सुनील साळवे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील,पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव,दैनिक समर्थ गावकरी चीफ एडिटर विश्वासराव आरूटे,

नगरसेवक नितीन गावडे,माजी नगरसेवक योगेश ससाणे, नगरसेवक मारुतीआबा तुपे,सुनील बनकर, सन्मित्र बँकेचे अध्यक्ष गणेश फुलारे,महसूल अधिकारी दीपक चव्हाण, पत्रकार दिगंबर माने अनिल मोरे,नागेश माने प्रमोद गिरी,दीपक शिंदे निलेश बढे,सुमेर परदेशी, काँग्रेस नेते प्रशांत सुरसे, पल्लवी सुरसे, स्वरांजली वाघमारे,दौलत सावंत,आरपीआय नेते संतोष खरात,संजय पट्टणपल्लु,सतीश आल्हाट,स्वीकृत नगरसेवक नितीन आरु, अविनाश काळे,संजय शिंदे,शिव व्याख्याते पैगंबर शेख,बैलगाडा मालक शैलेश आल्हाट,बाळासाहेब हिंगणे, सुशीला गुंजाळ,पप्पू बागवान, महेश ससाने,विशाल डावरे,मुकेश सोनवणे, हर्षल भोसले,उद्धव चिलवंत,संजीतसिंग परदेशी,प्रशांत बोगम,सुफियान खान,बाळकृष्ण पवार, गणेश वाडकर,अमित गायकवाड,प्रवीण हिलगे,मेटे मामा,शंकर ससाने,गोपी चव्हाण, रितेश वाघमारे, नितेश वाघमारे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा देत कार्यक्रमांचे कौतुक करत आयोजक शशिकला वाघमारे आणि पुण्याचे दैनिक समर्थ गावकरी संपादक राकेश वाघमारे यांचे अभिनंदन केले. आलेल्या मान्यवर पाहुण्यांचे यावेळी शशिकलाताई वाघमारे,पुण्याचे दैनिक समर्थ गावकरी संपादक राकेश वाघमारे राकेश वाघमारे यांनी संविधानाची प्रतिमा,शाल देऊन स्वागत केले.




## थोडक्यात पण महत्वाचे




### गुणवंतांचा सत्कार समारंभ संपन्न

इंदापूर (स. गांवकरी) : बावडा (ता- इंदापूर) येथे किसान सार्वजनिक वाचनालय,शेतकरी संघर्ष समिती,किसान बहुउद्देशिय संस्था व बावडा ग्रामस्थांच्या वतीने रविवार दि. 19 एप्रिल रोजी किसान सार्वजनिक वाचनालयाच्या हॉलमध्ये गावातील सेवानिवृत्त शिक्षक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उत्तम काम करून राज्य स्तरावरील सन्मान प्राप्त केलेले एम. पी. एस .सी परीक्षेत यश संपादन करून राज्य शासनातील विविध पदावर निवड झालेल्या गुणवंतांचा शाल पुष्पहार गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. यामध्ये संभाजी टोंगळे व सुरेश शिंदे(सेवानिवृत्त शिक्षक), मेजर किशोर घोगरे(सेवानिवृत्त सैनिक), प्रख्यात भारूडकार ह.भ.प.लक्ष्मण राजगुरु (दादा कोंडके समाजरत्न पुरस्कार) तात्याबा गायकवाड ( समाजभूषण पुरस्कार) ,ओंकार आसबे (विक्रीकर अधिकारी), बाळासाहेब माने ( धाराशिव जिल्हा गुप्तचर विभाग प्रमुख पदावर बढती), ऋषिकेश घोगरे (नगररचनाकार वर्ग 1) यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मयूरसिंह पाटील हे होते . यावेळी निरा भिमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक उमेश पाटील, ज्ञानदेव बागल , तुकाराम घोगरे, निलेश घोगरे , विजय काटकर , पंडितराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मयूरसिंह पाटील,लक्ष्मण राजगुरु,सुरेश शिंदे व उमेश पाटील यांनी मनोगत व्यक्त केली. मयूरसिंह पाटील यांनी किसान सार्वजनिक वाचनालयास आकरा हजार रूपये देणगी जाहीर केली. तसेच तात्याबा गायकवाड सिरींज फॅन भेट दिला. कार्यक्रमांच्या प्रास्ताविक व आभार किसान सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पंडितराव पाटील यांनी केले.

## 'शिव फुले शाहू आंबेडकर' व्याख्यानमालेतून पुरोगामी विचारांची मशाल प्रज्वलित





**अकोले : (स. गांवकरी)**

अकोले येथे पार पडलेल्या "शिव फुले शाहू आंबेडकर" व्याख्यानमालेतून पुरोगामी विचारांचा जागर घडला. जोषपूर्ण वातावरणात सादर झालेली समतेची गीते, व्याख्यानमालेसाठी विविध वक्त्यांची निवड त्यांनी श्रोत्यांची मने जिंकून घेणारी केलेली प्रभावी मांडणी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणाऱ्या "संघम् शरणम् गच्छामी" या महानाट्याच्या प्रभावी सादरीकरणामुळे ही व्याख्यानमाला खऱ्या अर्थाने विचारांची मशाल पेटवणारी आणि चळवळीला बळ देणारी ठरली. श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारा नवी उमेद जागवणारा ठरला. अकोले तालुक्यात सामाजिक चळवळींसोबत वैचारिक आणि सांस्कृतिक अभिसरण घडवणारे उपक्रम सातत्याने राबविले जातात. महात्मा फुले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने आयोजित केली जाणारी व्याख्यानमाला त्यापैकीच एक प्रभावी उपक्रम आहे. गेल्या दोन दशकांत विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या सहभागामुळे या व्याख्यानमालेने वैचारिक उंची गाठली होती; मात्र काही वर्षे त्यात खंड पडला होता.

यावर्षी भाऊसाहेब चासकर, प्रा. विजय भगत, रवी रूपवते, प्रा. संदेश कासार, अनिल मोहिते, प्रा. किरण जाधव या शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत बळीराजा अभ्यास मंडळ व संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या माध्यमातून व्याख्यानमाला पुन्हा सुरू केली. तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा सहभाग लाभल्याने कुंठित झालेला प्रबोधनाचा प्रवाह नव्या जोमाने प्रवाहित झाला.

व्याख्यानमालेची सुरुवात ज्येष्ठ पत्रकार आणि रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते पी. साईनाथ यांच्या "शेती आणि शेतकऱ्यांसमोरील आव्हाने" या व्याख्यानाने झाली. भांडवलदारांचे लाड थांबून शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही तर शेती संकट अधिक तीव्र होईल, असा इशारा देत त्यांनी शेतकरी आंदोलनांची गरज अधोरेखित केली.

दुसऱ्या दिवशी नव्या पिढीतील कवी डॉ. स्वप्नील चौधरी यांच्या "चल दंगल समजून घेऊ" या कविता सादरीकरणाने वातावरण रंगले. समकालीन परिस्थितीवर त्यांनी परखड भाष्य करत श्रोत्यांची जबरदस्त दाद मिळवली.

तिसऱ्या दिवशी शामसुंदर सोन्नर महाराज यांनी "समतेची शिकवण देणारा वारकरी संप्रदाय आणि आजचा महाराष्ट्र" या विषयावर व्याख्यान दिले. संत परंपरेतील समतेचा विचार, महिलांचे योगदान आणि आध्यात्मिक लोकशाहीची संकल्पना त्यांनी अभंगांच्या दाखल्यांसह प्रभावीपणे मांडली.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त हैदराबाद येथील अभ्युदय कला अकादमीच्या २१ कलाकारांनी सादर केलेल्या "संघम् शरणम् गच्छामी" या महानाट्याने व्याख्यानमालेचा समारोप झाला. समकालीन वास्तवावर केलेले भेदक भाष्य प्रेक्षकांना विचारप्रवृत्त करणारे ठरले.

नव्या कार्यकर्त्यांनी ही व्याख्यानमालेच्या आयोजनाचे शिवधनुष्य लीलया पेलले. कोणत्याही प्रायोजकांशिवाय लोकवर्गणीतून खर्च भागवण्यात आला. अडीचशेपेक्षा अधिक नागरिकांनी २०० ते ५००० रुपयांपर्यंत योगदान दिले. समाजमाध्यमांचा प्रभावी आणि खुबीने वापर करून प्रचार करण्यात आला. त्यामुळे व्याख्यानमालेला श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. अकोलेकर रसिक प्रेक्षकांची सांस्कृतिक भूक शाबूत असल्याचे दिसून आले. अनेक दिवसांनी आयोजित व्याख्यानमालेत भाषण कविता नाटक अशा साहित्यिक मेजवानीचा आस्वाद प्रेक्षकांना घेता आला. विषयांचं वैविध्य हे व्याख्यानमालेच वैशिष्ट्य होतं.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी चारही दिवस श्रोता म्हणून उपस्थिती लावली. तीच गोष्ट डॉ. अजित नवले, विजय वाकचौरे, विनय सावंत यांचीही. शिक्षकांचे समाजभान हरपले असल्याची टीका होत असताना या व्याख्यानमालेच्या आयोजनात शिक्षकांचा पुढाकार महत्त्वाचा होता. अकोले शहरातील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात आयोजित उपक्रमाला अकोलेकरांनी मोठी गर्दी करुन दिलेला जोरदार प्रतिसाद पाहून ही शाळाही धन्य झाली," असे उद्गार आमदार लहामटे यांनी समारोप प्रसंगी काढले. या व्याख्यानमालेमुळे अकोले तालुक्यात वैचारिक पेरणीचा नवा अध्याय पुन्हा एकदा सुरू झाल्याचे आशादायी चित्र दिसले.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म नोंद/१०९/२०२५ अकोले दि.१२/११/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. स्वाती भाऊसाहेब एखंडे, रा. टाहाकारी,** ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांची मुलगी कु.दिव्या भाऊसाहेब एखंडे हिचा जन्म दि. ११/०१/२००४ रोजी टाहाकरी** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **टाहाकरी**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. स्वाती भाऊसाहेब एखंडे, रा. टाहाकारी**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांची मुलगी कु.दिव्या भाऊसाहेब एखंडे हिचा जन्म दि. ११/०१/२००४ रोजी टाहाकरी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **टाहाकरी**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/११/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## मानव एकता दिवस : सेवा आणि आध्यात्मिक समरसतेचा एक पावन उत्सव

### मानव एकता दिवसानिमित्त संत निरंकारी मिशन तर्फे पुण्यासह देशभरात भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन

**पुणे (स. गांवकरी)**

जेव्हा मानवाच्या हृदयात प्रेमाची मधुर आणि अखंड धारा प्रवाहित होते आणि आत्मा एकत्वाच्या दिव्य स्पंदनाने उजळून निघतो, तेव्हाच मानवतेचे खरे आणि पवित्र स्वरूप प्रकट होते. हीच ती अवस्था आहे जिथे सर्व भेदभाव आपोआप नाहीसे होतात आणि करुणा, समरसता तसेच सार्वभौम बंधुभावाची भावना जिवंत होते. याच दिव्य आध्यात्मिक चेतनेला साकार करण्यासाठी संत निरंकारी मिशन तर्फे बाबा गुरबचन सिंह जी यांच्या पावन स्मृतीनिमित्त 'मानव एकता दिवस' २४ एप्रिल २०२६ रोजी श्रद्धा, समर्पण आणि प्रेममय वातावरणात आयोजित केला जाणार आहे, जो संपूर्ण मानवजातीला एकत्व, सेवा आणि सद्भाव यांचा अमूल्य संदेश देईल.




सदगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन आशीर्वादाने पुण्यातील विविध सत्संग भवनांमध्ये भव्य आणि दिव्य सत्संगाचे आयोजन करण्यात येईल, जिथे श्रद्धाळू भक्त प्रेम, भक्ती आणि आध्यात्मिकतेच्या अद्वितीय संगमाचा अनुभव घेतील. हा पावन प्रसंग केवळ एक आयोजन नसून, आत्मिक जागृतीचा उत्सव असेल, जो प्रत्येक हृदयाला ईश्वरीय एकत्वाच्या अनुभूतीशी जोडून आंतरिक शांती आणि समाधानाचा अनुभव करून देईल. यासोबतच, देश-विदेशातील विविध शाखांमध्येही श्रद्धाळू भक्त एकत्र येऊन या दिव्य सत्संगाला सखोल आत्मिक भावाने साकार करतील. या पावन संगमाच्या माध्यमातून प्रत्येक हृदय प्रेम, शांती आणि बंधुत्वाच्या प्रकाशाने उजळून निघेल तसेच मानवतेच्या एकात्मतेचा संदेश जगभर प्रसारित होईल.

या मानव एकता दिवसानिमित्त पुण्यामध्ये संत निरंकारी सत्संग भवन-जय जवान नगर (फॉरेस्ट पार्क) त्याचबरोबर संत निरंकारी सत्संग भवन-काळेवाडी येथे एकाच दिवशी सकाळी ८ वाजेपासून दुपारी ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर अत्यंत श्रद्धा, समर्पण आणि सेवा-भावाने आयोजित करण्यात आले आहे. या पावन सेवा यज्ञात वाय.सी.एम. रुग्णालय, ससून रुग्णालय, संत निरंकारी रक्तपेढीचे अनुभवी डॉक्टरांचे समर्पित पथक आपल्या कौशल्य आणि करुणेने सेवा प्रदान करतील, ज्यामुळे हा उपक्रम मानवतेप्रती संवेदनशीलतेचे एक जिवंत उदाहरण ठरेल. हा पावन दिवस बाबा गुरबचन सिंह जी आणि चाचा प्रताप सिंह जी यांच्या दिव्य स्मृतीला समर्पित आहे, ज्यांचे संपूर्ण जीवन त्याग, समर्पण आणि निःस्वार्थ सेवेचे एक अद्वितीय उदाहरण राहिले आहे. त्यांनी आपल्या आचरणातून आणि विचारांतून मानवतेला प्रेम, नम्रता आणि परोपकाराचा खरा मार्ग दाखवला. त्यांचे दिव्य आदर्श आजही प्रत्येक हृदयात सेवा, भक्ती आणि एकत्वाचा प्रकाश प्रज्वलित करतात आणि संपूर्ण मानवजातीला ही प्रेरणा देतात की, खरी साधना केवळ शब्दांत नसून निस्वार्थ सेवा, करुणा आणि परस्पर बंधुभावामध्ये सामावलेली आहे. संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय श्री जोगिंदर सुखीजा यांनी विस्तृत माहिती देताना सांगितले कि संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरांमध्ये हजारो श्रद्धाळू निःस्वार्थ भावनेने रक्तदान करून मानवजीवनाच्या रक्षणासाठी आपले अमूल्य योगदान देतील. ही सेवा केवळ गरजूंमध्ये नवीन आशा निर्माण करत नाही, तर रक्तदान करणाऱ्यांच्या मनातही आत्मिक समाधान, शांती आणि कृतार्थतेची दिव्य अनुभूती निर्माण करते.

# वडगाव आनंद- पादिरवाडी रस्त्याचे काम अखेर सुरु




**वडगाव आनंद : (स. गांवकरी)**

वडगाव आनंद ते पादिरवाडी हा रस्ता गेली दीड वर्षांपासून निधीअभावी व प्रशासकीय कारणांमुळे रखडला होता. खड्ड्यांमुळे प्रवासी व शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. मात्र, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ वाळुंज यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सोमवारपासून प्रत्यक्षात सुरू झाले आहे. काम सुरू झाल्याने परिसरातील ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. वडगाव आनंद ते पादिरवाडी हा सुमारे २.६०० किमीच्या या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून मे डी जी बेल्हेकर आणि कंपनी नारायणगाव या ठेकेदाराने घेतले होते, मागील दीड वर्षांपूर्वी ठेकेदाराने खडीकरण करून त्यावर डांबर टाकण्याचे काम अपूर्ण सोडले होते वारंवार त्याच्याशी पाठपुरावा करून देखील ठेकेदार काही कामाला सुरुवात करत नव्हता पूर्णपणे ओबडधोबड असणाऱ्या रस्त्यावरून दुचाकीस्वारांचे अपघात नित्याचे झाले होते. शाळेतील विद्यार्थी, गरोदर माता व वयोवृद्ध नागरिकांना या रस्त्याने प्रवास करणे जिकिरीचे झाले होते.स्थानिक नागरिकांनी व प्रसार माध्यमांनी अनेकदा बातम्या देखील केल्या होत्या परंतु सदर ठेकेदार हा कोणत्याही प्रकारची दाद देत नव्हता त्यामुळे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता श्री सत्यशील नगराळे साहेब यांच्याशी सदर विषयाबाबत चर्चा केली असता जुन्नर शाखा अभियंता श्री कोळेकर साहेब यांनी रविवार पर्यंत काम चालू करण्याचे आश्वासित केले होते, त्याप्रमाणे सोमवार दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी कामाचे साधनसामग्री येणे सुरुवात झाली व आज प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली उपअभियंता श्री. खाडे साहेब यांनी लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदाराला दिल्या आहेत. काम सुरू झाल्याने पादिरवाडी, वडगाव आनंद, आळेफाटा येथील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून नवनाथ वाळुंज यांचे आभार मानले आहेत.



ठाणे : ठाणे महापालिकेच्या प्रभाग क्र. २९ मधील देसाई ते पडले गाव येथील खराब अवस्थेत असलेली जुनी पाण्याची लाईन काढून ठाणे महानगरपालिका मार्फत क्रोमा शोरूमच्या समोर देसाई नाका येथे ५०० मिमी व्यासाची नव्याने पाईपलाइनचे उद्घाटन करण्यात आले आहे . आता या पाईप लाइनचे काम चालू झाल्याने देसाई पडले खिडकाळी भागातील गावांची पाण्याची समस्या दूर होणार आहे. सदर उद्घाटन प्रसंगी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना निलेश पाटील, नगरसेविका वेदिका साहिल पाटील, उपअभियंता वाघीरे, विभागप्रमुख विष्णू कोटकर, दीपेश पाटील, मधुकर पाटील, बाळाराम पाटील, साहिल पाटील, विनायक पाटील, राकेश पाटील आदी उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...




### पवार चारिटेबल ट्रस्टच्यावतीने विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप

इंदापूर **(स. गांवकरी)** : तरंगवाडी( ता- इंदापूर) येथील कै. समाजरत्न शिवाजी (बापू )शेंडगे विद्यालय येथील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सौ सुप्रियाताई सुळे यांच्या माध्यमातून पवार चारिटेबल ट्रस्टच्या वतीने विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मधुकर भरणे यांच्या हस्ते व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकारी सदस्य अमोल भिसे,राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष तेजसिंह पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रवक्ते डॉ. शशिकांत तरंगे, जिल्हा परिषद सदस्या सौ निर्मलाताई मिसाळ, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष सागर मिसाळ, महिला अध्यक्ष छायाताई पडसळकर, गुरुकुल शिक्षण संस्थेचे हरणावळ सर, सरपंच तुकाराम करे, ग्रामस्थ, शिक्षक ,विद्यार्थी व इतर मान्यवर त्यांच्या उपस्थितीत मोफत सायकल वाटप करण्यात आले.

### प्रा. डॉ. संग्राम आंदे यांची बँकॉग येथील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निवड

मुखेड **(स. गांवकरी)** : गेली अनेक वर्षापासून प्रा.संग्राम आंदे, यांनी सामाजिक,व शैक्षणिक, क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करून त्यांचा गौरव करण्यात आला त्यांना आतापर्यंत १०० पुरस्कार मिळाले असून आता त्यांची बँकॉग येथील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निवड झाली आहे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील समाजशास्त्र या विषयाचे गाढे अभ्यासक म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते त्यांनी आतापर्यंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये आपला सहभाग नोंदवला आहे त्यांचे आतापर्यंतचे शैक्षणिक कार्य अनमोल ठरले आहे अनेक ग्रंथाचे लेखन अनेक आर्टिकल चे लेखन त्यांनी आतापर्यंत केले आहे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शंभर पुरस्काराचा आकडा पार करत आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले नावाचा ठसा उमटवला आहे एक अष्टपैलू चे स्थान निर्माण केले आहे त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी.अडकिने, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, प्राचार्य गोंने, प्रा.डॉ. डि के. आहेर, प्रा. दिगाबर नेटके, इत्यादींनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



### डिंगोरे येथे पुष्पावती विद्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

ओतूर **(स. गांवकरी)** : जुन्नर तालुक्यातील डिंगोरे येथील पुष्पावती विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उभारणीसाठी भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. भूमिपूजन माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव निवृत्ती तांबे व जयश्री तांबे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त कस्टम अधिकारी सुनील आमले हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये माजी आमदार अतुल बेनके, माजी आमदार दिलीपराव ढमढेरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय काळे, आशाताई बुचके, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोक घोलप, उद्योजक डॉ. मंगेश आमले, माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले, सोनाबाई दाभाडे, तुषार थोरात, पंचायत समिती सदस्या नीलम आमले, आशा डावखर, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक विष्णूशेठ शेरकर, दत्तात्रय गबाजी लोहोटे, खरेदी-विक्री संघाचे व्हाइस चेअरमन तसेच मुक्तादेवी मंडळ मुंबईचे सचिव वसंत लोहोटे, विविध विकास सहकारी सोसायटीचे चेअरमन जालंदर उकिरडे, लक्ष्मण लोहोटे, पांडुरंग लोहोटे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक एम. एन. पुरी. धोंडीभाऊ मोरे, शिवाजी आस्वार तसेच विद्यमान मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांच्यासह ग्रामविकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, सचिव प्रदीप गाढवे, पंकज घोलप, विठ्ठल शितोळे, संजय हिरे, सरपंच सीमाताई सोनवणे व उपसरपंच नीलेश लोहोटे उपस्थित होते. कार्यक्रमात प्रास्ताविक योगेश आमले यांनी केले. मनोगत व्यक्त करताना माजी आमदार अतुल बेनके, संजय काळे, माजी आमदार दिलीप ढमढेरे, डॉ. मंगेश आमले, सोनाबाई दाभाडे, अंकुश आमले, आशाताई बुचके व अध्यक्ष सुनील आमले यांनी विद्यालयाच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पाडेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वामी विवेकानंद विचार मंच डिंगोरेचे सर्व सदस्य तसेच जगन्नाथ गाढवे, मंगेश अण्णा डुंबरे यांनी विशेष सहकार्य केले. आभार प्रदर्शन अनिल उकिरडे यांनी केले. यावेळी विद्यालयाच्या नूतन इमारतीसाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी उदारपणे आर्थिक मदत करावी, असे आवाहन केले.

# परशुरामाची परशु दाखवण्याकरीता नसून अन्यायाच्या विरोधामध्ये चालवण्यासाठीच

**आमदार गोपीचंद पडळकर**



**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

अहिल्यानगर हे नामकरण झाल्यानंतर एक प्रचंड ऊर्जा, प्रचंड शक्ती हिंदू कार्यकर्त्यांच्यामध्ये निर्माण झाली असून काही लोकांना आता सोसत नाही. देवा भाऊच्या सरकारने निर्णय घेतला म्हणजे तो अंतिम त्यामध्ये काही मागेपुढे काहीच नसतं श्री परशुराम प्रतिष्ठानला खूप चांगला कार्यक्रम केला आहे. मला तुम्हाला सगळ्यांना विनंती करायची आहे. तुम्ही सुद्धा या सगळ्या देवांच्या ताकदीने पुढे आला पाहिजे बिरोबाला ,जोतिबाला , खंडोबाला तुम्ही सहकुंटुब आले पाहिजे परंतु आपण सगळ्यांनी एकत्रित आले पाहिजे तुम्ही सुद्धा पट्टणकोडोलीच्या आमच्या यात्रेच्या वेळेस भंडाऱ्याला लावून निघायला पाहिजे अरे कोण आपल्याला वेगळं करू शकत नाही कुठली शक्ती नाही की जे महाराष्ट्रामध्ये आपल्याला वेगळं करेल. परशुरामाची परशु काय नुसती दाखवण्याकरीता नसून अन्यायाच्या विरोधामध्ये चालवण्यासाठीच आहे आणि ती आपण चालवलीच पाहिजेत असे प्रतिपादन आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले. भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने पायी शोभायात्रा सायंकाळी रेणुकामाता मंदिर (प्रोफेसर कॉलनी चौक) ते भिस्तबाग चौक, सावेडी भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाची सांगता झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष समर्थभक्त मंदारबुवा रामदासी हे होते.आमदार गोपीचंद पडळकर, वे शा सं सिध्देश्वर निसळ गुरूजी, ह.भ.प. कुं. रेणुकाताई निसळ ,सीए संजय देशमुख, सीए असोसिएशन चे अध्यक्ष अभय कटारिया,पुष्कर कुलकर्णी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे, श्रीया देशमुख, अनंत कुलकर्णी, अतूल शुक्ल अनिरुद्ध भहूरकर,शिरीष देशपांडे, अमित डोंगरे अनिरुद्ध भऊरकर, प्रशांत भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते. मंदारबुवा रामदासी म्हणाले सनातन धर्माचे अंग वैदिक ब्राम्हण,गोमाता, यज्ञ,वेद, हे नष्ट करा सनातन धर्म नष्ट झाला म्हणजे देवाचा पराभव होईल. म्हणजे दैवी विचार, दैवी संस्कृतीचा पराभव होईल ही मुळ विचारधारा आजही जिवंत आहे. वारकरी संपदायाचा पाया भागवत धर्म सनातनी व वारकरी हे वेगळे असू शकत नाहीत प्रत्येक वारकरी हिंदू आहे आणि प्रत्येक हिंदू सनातनी आहे.अभिमानाने प्रत्येकाने सांगितले पाहीजे की सनातनी हिंदू आहोत हिंदूना एकता शिकवायची गरज कारण ती त्यांच्या रक्तामध्ये आहे. आजच्या युगात एकतेच्या नावाखाली विविधता नष्ट करायला सांगते आमचा सनातन धर्म विविधता नष्ट करायला सांगत नाही. विविधेत एकता सांभाळायला सांगते हिंदू समाजातील वेगवेगळया जाती वेगवेगळया फुलासारखी आहेत ब्राम्हणाकडून मोठे काम करणे अपेक्षित आहे. ते म्हणजे हिंदू वेगवेगळया जातीमध्ये विखुरला आहे त्या समाजाला एकत्रित गुंफण्याचे काम आहे भगवान परशुराम हे भगवद अवतार होते या अवताराची आराधना टिकवणे महत्वाचे आहे भगवान परशुराम चरीत्रात मातृपितृ भक्ती शिकायला मिळते. ह.भ.प. रेणुकाताई निसळ म्हणाली हिंदू समाजाचे विचार कसे आम्ही दोन आणि आमचे दोन आम्ही दोन आणि आमचे दोन आमचाच होता चौकोन चौकोनातून जातात दोन आणि उरलेल्यांना आधार कोण अशी परिस्थिती आपल्या धर्माची आज भोजनाला साठ, भजनाला आठ आणि धर्मकार्यासाठी आले तर आले नाहीतर चल हट घरातील मुलीला जवळ बसवून दोन गोष्टी सांगा बाई तू मोठी होऊन डॉक्टर , इंजिनियर ,वकील झाली नाही तरी चालेल पण बाई तुला मोठं होऊन चारित्र संपन्न व्हायचं म्हणजे व्हायचं ही पहिली गोष्ट मुलीला सांगा आणि दुसरी गोष्ट मुलीला सांगा की बाई तू तुझ्या मनाला इतकं कठोर बनव की सुंदरातला सुंदर , कर्तृत्व संपन्न , रूपसंपन्न मुलगा तुझ्यासमोर येऊ दे पण तुझा तुझा ब्रह्मचर्य मोडणार नाही दोन गोष्टी जर आपल्या घरातील मुलीला सांगितले ना तरच पुढे जाऊन परशुराम भगवंतासारखे वीर पुरुष आपल्या घरी जन्म घेऊ शकतील बालकांना आपल्या शक्तीने आपल्या तेजाने संपूर्ण पृथ्वीतलावर धर्माची स्थापना करतील फक्त भगवंताचं नाव जय परशुराम म्हणून चालणार नाहीये आज फक्त परशुराम भगवंत हे ब्राह्मण दैवत नाहीये तर संपूर्ण हिंदू समाजाचा दैवत आहे.

## उज्वला भाऊ भंडलकर पोलीस पदी निवड



**आळे : (स. गांवकरी)**

वारीची परंपरा जपणारे, आषाढी-कार्तिकी वारीतील झेंडेकरी म्हणून परिचित असलेले आळे येथील श्री. भाऊमामा भंडलकर यांची सुकन्या कु. उज्वला भाऊ भंडलकर हिची मुंबई लोहमार्ग पोलीस दलात पोलीस शिपाई पदी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल आळे व परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील व सामान्य कुटुंबातील उज्वला हिने अत्यंत जिद्द व चिकाटीने अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. पोलीस भरतीसाठी लागणारी शारीरिक क्षमता चाचणी व लेखी परीक्षा तिने पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली. वडिलांचा वारकरी संप्रदायाचा वारसा आणि शिस्तीचे बाळकडू तिला यशाच्या शिखरावर घेऊन गेले, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.निवडीनंतर प्रतिक्रिया देताना कु. उज्वला भंडलकर म्हणाली, "माझे वडील वारीला जातात. त्यांनी मला नेहमी सांगितले की, 'पांडुरंगाचे नामस्मरण कर आणि कष्ट कर, यश नक्की मिळेल.' त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून मी अभ्यास केला. आज मुंबईसारख्या ठिकाणी लोहमार्ग पोलीस म्हणून काम करण्याची संधी मिळाली याचा आनंद आहे. ग्रामीण भागातील मुलींनी मोठी स्वप्न पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी कष्ट करावेत. आई-वडिलांचे व गावाचे नाव मोठे करणे हेच माझे ध्येय आहे. उज्वलाच्या या निवडीबद्दल श्री. उदय दिलीप तितर, श्री. अरुण (आबा) गेणु शिरतर, श्री. अरुणबुवा नारायण गुंजाळ व श्री. भाऊमामा भंडलकर मित्र परिवार आळे यांच्यावतीने तिचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. लवकरच आळे येथे तिचा जाहीर सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार असल्याचे मित्र परिवाराने सांगितले.

## श्रीराम मंदिर येथे विराट हिंदू संमेलनास उस्फूर्त प्रतिसाद

- जनसंख्या वाढवून अहिल्यानगर, महाराष्ट्र तसेच भारत देशात इस्लामीकरण करण्याचे षडयंत्र-सुरेश चव्हाणके

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**



हिंदुस्थानावर हिरवा झेंडा फडकवणाऱ्या औरंगजेबाला येथे मारण्यात आले. औरंगजेबाचे हाडे देखील या भूमीत पुरु दिली नाहीत. संभाजीनगर येथे त्याचे थडगे करावे लागले.एवढे शूरवीर अहिल्यानगर चे वंशज होते. शरद पवार यांच्या पार्टीचे प्रवक्ते वारकरी संत संप्रदायातील लोकांना घुसखोर म्हणतात.त्या शरद पवारांना महाराष्ट्रात घुसलेले ८० लाख बांगलादेशी,रोहिंगे,पाकिस्तानी घुसखोर दिसत नाही का? वारकरी संप्रदायाला घुसखोर म्हणल्यास हिंदू समाज खपवून घेणार नाही. ज्या वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे.वारकरी संप्रदायामुळे येथील आत्महत्या थांबल्या आहेत.समाजात दारू पिणाऱ्यांचे प्रमाण कमी होऊन व्यसनमुक्ती झाली आहे.वारकरी संप्रदायातील संत हे आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ आहेत. पूर्वी अहिल्यानगर मध्ये हिंदू बहुल असणारे मुकुंदनगर, गोविंदपुरा झेंडीगेट,आलमगीर परिसर आता हिंदू अल्पसंख्यांक झाला आहे.महाराष्ट्रात सर्वाधिक लव जिहाद च्या केसेस अहिल्यानगर येथे घडलेल्या आहेत.ही गंभीर बाब प्रशासनाने लक्षात घ्यावी. भारताने १९५२ साली हम दो हमारे दो हा नारा दिला होता. कायदा केला नव्हता तरीही हिंदूंनी वेदमंत्राप्रमाणे त्याचे पालन केले.हिंदूंचा जन दर कमी होत चालला आहे.ही चिंतेची बाब आहे.

देशाच्या फाळणीनंतर पाकिस्तान,अफगाणिस्तान, तुर्की या मुस्लिम राष्ट्रांची लोकसंख्या चार पटीने वाढली आहे.याउलट भारतामधल्या मुस्लिमांची लोकसंख्या दहा पटीने वाढली. हे अगदी सहज झाले नाही. जनसंख्या वाढवून अहिल्यानगर,महाराष्ट्र तसेच भारत देशात इस्लामीकरण करण्याचे षडयंत्र आहे.असे प्रतिपादन हिंदुत्ववादी प्रखर वक्ते व सुदर्शन न्युज चैनल चे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके यांनी केले आहे.

नवी पेठ येथील श्रीराम मंदिर येथे कोहिनूर व परशुराम वस्ती यांच्या वतीने विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.डाळ मंडई येथील प्रभू श्रीराम मंदिर येथून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या शोभायात्रेत प्रभू श्रीरामाची भव्य मूर्ती,लाठी काठी तलवारबाजी करणाऱ्या मुली हे शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. या मिरवणुकीत हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.या शोभायात्रेचा समारोप नवी पेठ येथील श्रीराम मंदिर येथे करण्यात आला.यानंतर विराट हिंदू संमेलनालात प्रखर हिंदुत्ववादी वक्ते व सुदर्शन न्यूजचे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके,ह.भ.प.गोविंद शास्त्री मुकुंद काका जाटदेवळेकर व पश्चिम महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन प्रमुख नरेश करपे यांनी सभेला उद्बोधन केले. याप्रसंगी हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. हभप गोविंद शास्त्री जाटदेवळेकर महाराज म्हणाले, हिंदूंना जागृत करण्यासाठी देशात लाख सव्वा लाख विराट संमेलने झाली.ही संमेलने यशस्वी झाल्याची पावती वारकरी संप्रदायातील संतांना घुसखोर म्हणणाऱ्यांनी दिली आहे. महाभारतामध्ये विदुरांचा अपमान करणारे कौरव नेस्तनाबूत झाले. रामायणात विभिषणाचा अपमान करणाऱ्या रावणाचा विध्वंस झाला. अनेकांनी रामाला काल्पनिक ठरवले तरीदेखील प्रभु श्रीरामाने त्यांना इंगा दाखविला नाही.

परंतु आता मात्र वारकरी संप्रदायातील संतांना घुसखोर ठरविले तर त्यांना प्रभू रामचंद्र व परमात्मा श्रीकृष्ण दोन ते तीन वर्षात काय इंगा दाखवतील हे कळेलच. हिंदू समाजात जागृती करण्यासाठी कृतिशीलतेचा भाग करावयाचा असेल तर आणखी मोठ्या प्रमाणात हिंदू संमेलने करावीत.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वाचा -डॉ आनंद कुलकर्णी



**निमगाव सावा : (स. गांवकरी)**

आपले भूमी ही छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आपण सर्वांनी वाचणे आवश्यक असून त्याचा अंगीकार केल्यास देशाचा सुजाण नागरिक घडेल. असे प्रतिपादन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांनी निमगाव सावा येथे बोलताना केले.

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गाचा निरोप समारंभ कार्यक्रम प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष संदिपान पवार, संस्थेचे सचिव परेश घोडे, प्राचार्य प्रल्हाद शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष परशुराम लगड इत्यादी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. डॉ.कुलकर्णी पुढे म्हणाले की, आपल्या महाराष्ट्राला वैभवशाली संतांची परंपरा आहे. त्यामध्ये माऊली ज्ञानेश्वर आणि तुकाराम महाराज यांचाही संदर्भ देत जे विज्ञानाने नंतर सिद्ध केले ते आधी ज्ञानेश्वरी मध्ये लिहिले गेले होते. ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी, तुकाराम महाराजांची गाथा ही आज अवघ्या जगाला मार्गदर्शक ठरत आहे. आपण सर्व विद्यार्थ्यांनी या सर्व गोष्टींचा विचार करून या थोर महात्म्यांचे संतांचे चरित्र वाचून अंगीकारले पाहिजे असे सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री परेश शेठ घोडे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या. सिद्धांत शेळके, कल्याणी पानमंद,साईनाथ कोयमहाले सानिका हिंगे, निशा साळवे या विद्यार्थ्यांनी आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अनिल पडवळ व प्राचार्य प्रल्हाद शिंदे यांनी मनोगतात विद्यार्थ्यां प्रति कृतज्ञता व्यक्त करत सर्वांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी तृतीय वर्ष कला वाणिज्य विज्ञान शाखेतील विद्यार्थी प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती गायकवाड, प्रास्ताविक, प्रा.नीलम गायकवाड आणि सुभाष घोडे यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)